नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

| वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २३६ Issue - 236 | वार गुरुवार दि. १५ जानेवारी २०२६ Blow- Thursday Date 15 January 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com |
|---|---|---|---|---|---|---|

# २९ महानगरपालिका निवडणुकांच्या मतदानासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज




## राज्यात २ हजार ८६९ जागांसाठी ३९ हजार ९२ मतदान केंद्राची व्यवस्था

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई (प्रतिनिधी) : राज्यातील २९ महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी गुरुवारी मतदान होत असून त्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज झाली आहे. २ हजार ८६९ जागांसाठी ही निवडणूक होत असून ३ कोटी ४८ लाख ७९ हजार ३३७ मतदारांकरिता ३९ हजार ९२ मतदान केंद्राची व्यवस्था करण्यात आली आहे. निवडणूक रिंगणात १५ हजार ९०८ उमेदवार आहेत; तसेच पुरेशा पोलीस बंदोबस्ताचीदेखील व्यवस्था करण्यात आली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या कार्यक्रमाची घो-षणा १५ डिसेंबर २०२५ रोजी केली होती. त्यानुसार बृहन्मुंबई, छत्रपती संभाजीनगर, नवी मुंबई, वसई- विरार, कोल्हापूर, कल्याण- डोंबिवली, ठाणे, उल्हासनगर, नाशिक, पुणे, पिंपरी- चिंचवड, सोलापूर, अकोला, अमरावती, नागपूर, चंद्रपूर, ला-तूर, परभणी, भिवंडी- निजामपूर, मालेगाव, पनवेल, मीरा- भाईंदर, नांदेड- वाघाळा, सांगली- मिरज, कुपवाड, जळगाव, धुळे, अहिल्यानगर, इचलकरंजी आणि जालना महानगरपालिकेसाठी मतदान होत आहे.

मतदान सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत होईल. मतमोजणीस संबंधीत ठिकाणी १६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता सुरवात होईल. मतदारांमध्ये १ कोटी ८१ लाख ९४ हजार २९२ पुरुष, १ कोटी ६६ लाख ८० हजार ४४९ महिला; तर ४ हजार ५९६ इतर मतदारांचा समावेश आहे. त्यांच्यासाठीच्या एकूण ३९ हजार ९२ मतदान केंद्रांपैकी एकूण ३ हजार १९६ संवेदनशील मतदान केंद्र घोषित करण्यात आली आहेत.

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची व्यवस्था

महानगरपालिका निवडणुकांसाठी पुरेशा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची (ईव्हीएम) व्यवस्था करण्यात आली आहे. त्यात ४३ हजार ९५८ कंट्रोल युनिट आणि ८७ हजार ९१६ बॅलेट युनिटची उपलब्धता केली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेसाठी ११ हजार ३४९ कंट्रोल युनिट आणि २२ हजार ६९८ बॅलेट युनिटची व्यवस्था केली आहे.

बृहन्मुंबई वगळता अन्य सर्व २८ महानगरपालिकांच्या निवडणुका बहुसदस्यीय पद्धतीने होत आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेत एका प्रभागातून एकच सदस्य निवडून द्यावयाचा असल्याने प्रत्येक मतद-ाराला केवळ एकच मत द्यावे लागेल. उर्वरित सर्व २८ महानगरपालिकांमध्ये बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीमुळे प्रत्येक प्रभागात साधारणत: चार जागा असतील. काही महानगरपालिकांच्या काही प्रभागांत तीन अथवा पाच जागा असू शकतील. त्यानुसार बृहन्मुंबई वगळता अन्य सर्व महानगरपालिका निवडणुकांमध्ये प्रत्येक मतदारा-ने साधारणत: ४ मते देणे अपेक्षित आहे. काही ठिकाणी ३ ते ५ मते देणे अपेक्षित असेल. बृहन्मुंबई महानगरपालिकेचे २२७ प्रभाग असून यासह सर्व महानगरपालिका मिळून ८९३ प्रभाग आहेत. त्यात २ हजार ८६९ जागांचा समावेश आहे. त्यासाठी १५ हजार ९०८ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

महानगरपालिका निवडणुकांसाठी पुरेशा पोलीस बंदोबस्ताची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यात ३ अपर पोलीस अधीक्षक, ६३ पोलीस उप अधीक्षक, ५६ पोलीस निरीक्षक, ८५८ सहायक पोलीस निरीक्षक / पोलीस उपनिरीक्षक आणि ११ हजार ९३८ पोलीस अंमलदारांचा समावेश आहे. त्याचबरोबर ४२ हजार ७०३ होमगार्ड देखील तैनात करण्यात आले आहेत. मतमोजणी आणि कायदा व सुव्यवस्थेच्या बंदोबस्तासाठी राज्य राखीव पोलीस दलाच्या एकूण ५७ कंपन्या तैनात करण्यात आल्या आहेत. महानगरपालिका निवडणुकांसाठीचे मतदान आणि मतमोजणीची तयारी; तसेच १२ जिल्हा परिषदा आणि त्याअंतर्गच्या १२५ पंचायत समितींच्या निवडणुकांची तयारी याबाबत राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. आयोगाचे सचिव सुरेश काकाणी, पोलीस महानिरीक्षक मनोजकुमार शर्मा आणि विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. मतदान, मतमोजणी; तसेच कायदा व सुव्यवस्था याबाबत उपस्थित प्रतिनिधींना अवगत करण्यात आले. महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये मोठ्या संख्येने मतदान करून आपणही आपल्या शहराच्या- महानगराच्या जडणघडणीत योगदान द्यावे आणि लोकशाही प्रक्रियेत सक्रीय सहभाग नोंदवावा. आपलं मत आपल्या शहराचं भवितव्य ठरवू शकतं. कारण ते अनमोल आहे. लोकशाहीतला तो आपला महत्वाचा हक्क आहे आणि तो आपण मतदानाच्या माध्यमातून बजवायला हवा, त्यासाठी आपण नक्की मतदान करावे, असे मतदारांना आवाहर केले आहे, असे महाराष्ट्र राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी सांगितले.

# ताडदेवमध्ये राडा! लाडक्या बहिणीच्या नावाखाली पैसे वाटपाचा आरोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महापालिका मतदानासाठी अवघे काही तास उरले असताना अनेक ठिकाणी पैशाच्या वाटपावरुन वाद निर्माण झाल्याचं दिसून येतंय. ताडदेव परिसरात (ढरीवशे) भाजपच्या कार्यकर्त्यांकडून पैसे वाटप करण्यात येत असल्याचा आर-ोप करण्यात येत आहे. ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी आणि स्थानिक महिलांनी विरोध केल्यानंतर भाजपच्या कार्यकर्त्यांनी पळ काढल्याचं दिसून आलं. प्रदीप छेडा, प्रकाश मोरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांकडून हे पैसे वाटप करण्यात येत असल्याचा आरोप असून ते मंत्री मंगल प्रभात लोढांचे जवळचे कार्यकर्ते असल्याची माहिती आहे.

ताडदेवमधील वॉर्ड क्रमांक २१५ मध्ये पैसे मतदारांना पैसे वाटप करण्यात येत असल्याची घटना घडली. लाडकी बहीण योजनेच्या नावाखाली भाजपचे प्रदीप छेडा, प्रकाश मोरे यांनी हे पैसे वाटप केल्याचा आरोप आहे. मात्र, इमारतीमधील महिलांनी उलट प्रश्न केल्यानंतर या कार्यकर्त्यांनी पळ काढल्याचं दिसून आलं.

प्रदीप छेडा हा मंगल प्रभात लोढांचा जवळचे सहकारी मानला जातो. भाजपच्या कार्यकर्त्यांकडून पैसे वाटप झाल्यानंतर त्याला ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी विरोध केला. त्यामुळे मतदानाच्या आदल्या दिवशी ताडदेवमधील वातावरण चांगलंच तापल्याचं दिसून आलं आहे.

ताडदेवमधील वॉर्ड क्र २१५ ठाकरेंच्या शिवसेनेकडून किरण बाळसराफ तर भाजपकडून संतोष ढाले निवडणुकीच्या रिंगणात आहेत. तर काँग्रेसने दोन टर्म नगरसेविका राहिलेल्या भावना कोळी यांना रिंगणात उतरवलं आहे.

ताडदेव वॉर्ड क्रमांक २१५ मध्ये ताडदेव, चिखलवाडी, भाटिया हॉस्पिटल, तुळशीवाडी या प्रमुख ठिकाणांचा समावेश होतो. यंदा हा वॉर्ड अनुसुचित जातींसाठी राखीव करण्यात आला आहे. २०१७ च्या महानगरपालिका निवडणुकीत ठाकरेंच्या शिवसेनेच्या अरुंधती दुधवडकर विजयी झाल्या होत्या. त्यावेळी त्यांनी भाजपच्या श्वेता मांजरेकर, काँग्रेसच्या ललिता माहिदा आणि मनसेच्या सरोज बाबर यांचा पराभव केला होता. २०१७ मध्ये निवडणुकीत सर्व पक्ष स्वतंत्र लढले होते. पण यंदा मात्र राजकीय समीकरणं बदलली आहेत.

आताच्या निवडणुकीत ठाकरेंची शिवसेना आणि भाजप या दोन प्रमुख पक्षांमध्ये लढत होणार आहे. मराठी पट्टा असलेल्या ताडदेवमध्ये ठाकरेंनी त्यांची ताकद पणाला लावल्याचं दिसतंय. त्यामुळे या प्रभागामध्ये कोण बाजी मारणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.


# बिनविरोध निवडीविरोधातील याचिका हायकोर्टाने फेटाळली

मुंबई : राज्यातील महानगरपालिका निवडणुकीत उमेदवारांच्या बिनविरोध निवडीविरोधात मनसेचे नेते अविनाश जाधव यांनी दाखल केलेली याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. उमेदवार बिनविरोध निवडून आला असेल तरीही मतदारांसाठी नोटाचा पर्याय असावा, अशी मागणी याचिकेत करण्यात आली होती. मात्र, न्यायालयाने याचिकाकर्त्यांना खडे बोल सुनावत ही याचिका फेटाळून लावली. तुम्ही न्यायालयात सकाळी चुकीची विधानं केली. रिट पिटिशन आणि आधीच्या याचिकेत सार्धम्य असल्याचे सांगितले. मात्र, यामध्ये काहीही साम्य आढळून आलेले नाही. त्यामुळे आम्ही याचिकाकर्त्यांना दंड ठोठावत असल्याचे सुरुवातीला न्यायमूर्तींनी सांगितले. आज सकाळी ही याचिका इतर प्रलंबित याचिकांसारखीच असल्याचे नमूद करण्यात आले होते. मात्र, सुनावणीसाठी याचिका पुकारण्यात आल्यानंतर ऑनलाईन उपस्थित असलेले असीम सरोदे यांनी सांगितले की ही याचिका तत्सम नसून निवडणुकीशी संबंधित आहे. यामुळे मुख्य न्यायाधीश श्री. चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम ए. अंखड यांच्या खंडपीठाने नाराजी व्यक्त केली. खंडपीठाने म्हटले, ही याचिका इतर याचिकांसारखीच असल्याचे चुकीचे विधान केल्याबद्दल आम्ही तुमच्यावर दंड लावणार आहोत आणि याचिका फेटाळणार आहोत, असे हायकोर्टाकडून सांगण्यात आले होते. आता सांगा, तुम्ही चुकीचे विधान का केले? एखाद्या पक्षकारासाठी अशी चुकीची माहिती देण्यामागे तुमची घाई किंवा भीती काय होती?, असा सवालही न्यायालयाने याचिकाकर्त्यांना विचारला. शेवटी न्यायालयाने दंड न आकारता ही याचिका फेटाळून लावली.

**डोनाल्ड ट्रम्प यांचा मोठा निर्णय** | **अमेरिकन उच्चायुक्तांना आदेश**

# रशिया-इराण-पाकिस्तानसह ७५ देशांच्या नागरिकांना व्हिसा देण्यावर बंदी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



न्यूयॉर्क : अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम आक्रमक धोरण राबवण्यास सुरुवात केली आहे. व्हेने-झुएलावर ताबा मिळवल्यानंत डोनाल्ड ट्रम्प यांनी इराण विरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या नेतृत्त्वात अमेरिकेनं ७५ देशांमधून व्हिसासाठी येणारे अर्ज नामंजूर करण्याचे आदेश दिले आहेत. अमेरिकेतील सार्वजनिक सेवांवर अवलंबून असणाऱ्या व्हिसा धारकांवर नजर ठेवणं हा उद्देश व्हिसा रद्द करण्यामागं आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी ज्या ७५ देशांच्या नागरिकांना व्हिसा नाकारण्यास सांगितलं आहे त्यात इराण, रशिया, अफगाणिस्तान, इराक, नायजेरिया आणि ब्राझील सारख्या देशांचा समावेश आहे. हे निर्बंध २१ जानेवारीपासून लागू होणार असून ते अनिश्चित काळासाठी लागू असणार आहेत.

फॉक्स न्यूजच्या अनुसार, अमेरिकन दूतावासांना सध्याच्या कायद्यानुसार व्हिसा देण्यास नकार देण्यास सांगण्यात आलं आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी गेल्या वर्षी जानेवारीत पदभार स्वीकारल्यानंतर व्यापक इमिग्रेशन कॅम्पेन अभियान राबवलं जातंय, त्या दरम्यान हा निर्णय घेण्यात आला आहे. अमेरिका आता व्हिसा अर्ज तपासणी आणि चौकशी प्रक्रियांचं पुनर्मूल्यांकन करणार आहे.

यादीत पाकिस्तानचा समावेश

डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनानं ज्या ७५ देशांच्या नागरिकांना व्हिसा देण्यास बंदी घातली आहे त्यामध्ये सोमालिया, इराण, थायलँड, येमेनचा देखील समावेश आहे. सोमालिया तर पहिल्यापासून अमेरिकन अधिकाऱ्यांच्या यादीत पहिल्या स्थाना-वर आहे. विशेष बाब म्हणजे या यादीत पाकिस्तान देखील आहे. अमेरिकेच्या विदेश विभागाचे प्रवक्ते टॉमी पिगॉट यांच्या मते अमेरिका त्यांच्या जुन्या शक्तीचा वापर करणार आहे. अमेरिकन जनतेचा फायदा घेऊन त्यांच्या कल्याणकारी किंवा सार्वजनिक सेवांवर अवलंबून असणाऱ्यांची संख्या कमी करण्याचा ट्रम्प प्रशासनाचा प्रयत्न आहे. भारत या यादीत नाही.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनानं नोव्हेंबर महिन्यात जगभरातील त्यांच्या उच्चायुक्तांना इमिग्रेशन कायद्याच्या पब्लिक चार्ज तरतुदीनुसार नव्या स्क्रीनिंग नियमांची अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिलेत. त्यानुसार जे व्हिसा अर्जदार सार्वजनिक सेवांवर अवलंबून राहू शकतात त्यांचे अर्ज नामंजूर करण्यास सांगितलं आहे.

अफगाणिस्तान, अल्बेनिया, अल्जेरिया, अँटिग्वा आणि बारबुडा, आर्मेनिया, अझरबैजान, बहामास, बांगलादेश, बार्बाडोस, बेलारूस, बेलीझ, भूतान, बोस्निया, ब्राझील, बर्मा, कंबोडिया, कॅमेरून, केप व्हर्दे, कोलंबिया, कोट डी'आयव्होअर, क्युबा, काँगोचे लोकशाही प्रजासत्ताक, डोमिनिका, इजिप्त, इरिट्रिया, इथिओपिया, फिजी, गांबिया, जॉर्जिया, घाना, ग्रेनाडा, ग्वाटेमाला, गिनी, हैती, इराण,इराक, जमैका, जॉर्डन, कझाकस्तान, कोसोवो, कुवेत, किर्गिस्तान, लाओस, लेबनॉन, लायबेरिया, लिबिया, मॅसेडोनिया, मोल्द-ोव्हा, मंगोलिया, मॉन्टेनेग्रो, मोरोक्को, नेपाळ, निकाराग्वा, नायजेरिया, पाकिस्तान, काँगो प्रजासत्ताक, रशिया, रवांडा, सेंट किट्स आणि नेव्हिस, सेंट लुसिया, सेंट व्हिन्सेंट आणि ग्रेनेडाइन्स, सेनेगल, सिएरा लिओन, सोमालिया, दक्षिण सुदान, सुदान, सीरिया, टांझानिया, थायलंड, टोगो, ट्युनिशिया, युगांडा, उरुग्वे, उझबेकिस्तान आणि येमेन



दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### जय्यत तयारी

राज्यातील २९ महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी गुरुवारी मतदान होत असून त्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज झाली आहे. २ हजार ८६९ जागांसाठी ही निवडणूक होत असून ३ कोटी ४८ लाख ७९ हजार ३३७ मतदारांकरिता ३९ हजार ९२ मतदान केंद्राची व्यवस्था करण्यात आली आहे. निवडणूक रिंगणात १५ हजार ९०८ उमेदवार आहेत; तसेच पुरेशा पोलीस बंदोबस्ताचीदेखील व्यवस्था करण्यात आली आहे. राज्य निवडणूक आयोगाने २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या कार्यक्रम ाची घोषणा १५ डिसेंबर २०२५ रोजी केली होती. त्यानुसार बृहन्मुंबई, छत्रपती संभाजीनगर, नवी मुंबई, वसई- विरार, कोल्हापूर, कल्याण- डोंबिवली, ठाणे, उल्हासनगर, नाशिक, पुणे, पिंपरी- चिंचवड, सोलापूर, अकोला, अमरावती, नागपूर, चंद्रपूर, लातूर, परभणी, भिवंडी- निजामपूर, मालेगाव, पनवेल, मीरा- भाईंदर, नांदेड- वाघाळा, सांगली- मीरज, कुपवाड, जळगाव, धुळे, अहिल्यानगर, इचलकरंजी आणि जालना महानगरपालिकेसाठी मतदान होत आहे. मतदान सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत होईल. मतम ोजणीस संबंधीत ठिकाणी १६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता सुरवात होईल. मतदारांमध्ये १ कोटी ८१ लाख ९४ हजार २९२ पुरुष, १ कोटी ६६ लाख ८० हजार ४४९ महिला; तर ४ हजार ५९६ इतर मतदारांचा समावेश आहे. त्यांच्यासाठीच्या एकूण ३९ हजार ९२ मतदान केंद्रांपैकी एकूण ३ हजार १९६ संवेदनशील मतदान केंद्र घोषित करण्यात आली आहेत. महानगरपालिका निवडणुकांसाठी पुरेशा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची (ईव्हीएम) व्यवस्था करण्यात आली आहे. त्यात ४३ हजार ९५८ कंट्रोल युनिट आणि ८७ हजार ९१६ बॅलेट युनिटची उपलब्धता केली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेसाठी ११ हजार ३४९ कंट्रोल युनिट आणि २२ हजार ६९८ बॅलेट युनिटची व्यवस्था केली आहे.

# मतदान : हक्कापलीकडे जाऊन लोकशाही जपण्याचे प्रभावी साधन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लोकशाही म्हणजे केवळ राज्यघटना, निवडणुका किंवा सत्ता बदलाची यंत्रणा नव्हे; लोकशाही म्हणजे सतत जागृत असलेली नागरिकांची जाणीव. या जाणीवेचा सर्वात प्रभावी, शांत आणि घटनात्मक आविष्कार म्हणजे मतदान. मतदानाला आपण अनेकदा माझा हक्क म्हणून संबोधतो. ते खरेही आहे. पण केवळ हक्क म्हणून मतदानाकडे पाहणे ही लोकशाहीची कक्षा मर्यादित करणारी भूमिका ठरते. वास्तवात मतदान हे केवळ हक्क नसून, लोकशाही जपण्याचे, टिकवण्याचे आणि सुधारण्याचे सर्वात प्रभावी साधन आहे. आजच्या काळात मतदानाबाबत वाढणारी उदासीनता, ‘एक मताने काय फरक पडतो?’ असा प्रश्न, किंवा ‘सगळेच सारखे आ-हेत’ ही मानसिकता, या साऱ्या प्रवृत्ती लोकशाहीसाठी धोक्याची घंटा आहेत. कारण लोकशाही निवडणुकीत मरत नाही; ती मतदान न करण्याच्या उद-ासीनतेत हळूहळू कोमेजते.

भारताने स्वातंत्र्य मिळवले तेव्हा जगातील अनेक देशांत सार्वत्रिक मतदानाचा हक्क नव्हता. शिक्षण, संपत्ती, जात, लिंग यांवर आधारित मताधिकाराच्या अटी होत्या. पण भारतीय राज्यघटनेने वयाची अट सोडली तर कोणताही भेद न करता मतदानाचा अधिकार दिला. हा निर्णय म्हणजे केवळ कायदेशीर तरतूद नव्हती; तो होता समतेचा, विश्वासाचा आणि नागरिकत्वाच्या सन्मानाचा घोष. म तदान हा बाबासाहेब आंबेडकरांच्या लोकशाही संकल्पनेचा गाभा होता. त्यांनी स्पष्ट सांगितले होते की, राजकीय लोकशाही टिकवायची असेल तर सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीही आवश्यक आहे. मतदानाद्वारे सामान्य माणसाला सत्तेच्या केंद्रापर्यंत पोहोचण्याचा मार्ग मिळतो. त्यामुळे मतदान म्हणजे कागदावर उमटवलेली खूण नसून, इतिहास घडवणारी कृती आहे.





– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

हक्क आणि जबाबदारी यांत मूलभूत फरक आहे. हक्क मिळाल्यावर तो वा-परणे अथवा न वापरणे हा वैयक्तिक निर्णय असू शकतो. पण मतदान ही जबाबदारी आहे, कारण त्याचा परिणाम संपूर्ण समाजावर, पुढील पिढ्यांवर आणि राष्ट्राच्या भवितव्यावर होतो. मतदान न करणे ही तटस्थता नसून, ती अनेकदा चुकीच्या शक्तींना मोकळे रान देणारी भूमिका ठरते. मतदान न करणारा नागरिक अप्रत्यक्षपणे म्हणतो, जे होईल ते चालेल. पण लोकशाहीत ‘जे होईल ते चालेल’ अशी भूमिका स्वीकारली, की लोकशाही हळूहळू हुकूमशाहीकडे झुकू लागते. म्हणूनच मतदान हे केवळ अधिकाराचे नव्हे, तर जबाबदारीचे आणि नैतिक कर्तव्याचे साधन आहे.

एका मताने काय फरक पडतो? हा प्रश्न लोकशाहीबद्दलच्या गैरसम जाचे द्योतक आहे. इतिहास साक्षी आहे की अनेक निवडणुका काही मतांच्या फरकाने जिंकल्या गेल्या आ-हेत. पण मुद्दा केवळ आकड्यांचा नाही. एक मत म्हणजे एक आवाज, आणि लाखो आवाज मिळून जनमत तयार होते. एक मत हे निषेधाचे साधन असू शकते, समर्थनाचे साधन असू शकते, बदलाची सुरुवात असू शकते. मतदान म्हणजे सत्ताधाऱ्यांना दिलेला पाच वर्षांचा ‘ब्लँक चेक’ नसून, तो असतो जबाबदारीचा पर-वाना काम चांगले केले तर पाठिंबा, अन्यथा नकार. लोकशाहीतील सर्वात मोठा धोका बाहेरून येत नाही; तो आतूनच निर्माण होतो, नागरिकांच्या उदासीनतेतून. जेव्हा लोक मतदानाकडे पाठ फिरवतात, तेव्हा अल्पसंख्याक म तांनी निवडलेली सत्ता बहुसंख्याकांवर राज्य करू लागते. अशा वेळी लोकशाही औपचारिक राहते, पण तिचा आत्मा मरतो. मतदान हे लोकशाहीचे संरक्षण कवच आहे. ते सत्तेला मर्यादा घालते, सत्ताधाऱ्यांना जनतेसमोर जबाबदार ठेवते आणि संस्थांना स्वायत्त ठेवण्यास मदत करते. नियमित, मुक्त आणि निष्पक्ष मतदान हीच लोकशाहीची खरी कसोटी आहे.

भारत हा तरुणांचा देश आहे. पण निवडणुकांमध्ये युवकांचा सहभाग अपेक्षेइतका दिसत नाही. सोशल मीडियावर मतप्रदर्शन करणारा तरुण अनेकदा मतदान केंद्रापर्यंत जात नाही. ही विसंगती धोकादायक आहे. कारण सोशल मीडियावरील प्रतिक्रिया क्षणिक असतात; मतदान मात्र स्थायी परिणाम घडवते.युवकांनी मतदानाकडे केवळ अधिकार म्हणून नव्हे, तर भविष्य घडवण्याचे साधन म्हणून पाहिले पाहिजे. शिक्षण, रोजगार, पर्यावरण, सामाजिक न्यायया सगळ्या प्रश्नांची दिशा मतदानातून ठरते. मतदान न करणारा तरुण उद्याच्या समस्यांवर तक्रार करण्याचा नैतिक अधिकार गम ावतो. मतदान हे केवळ राजकीय साधन नसून, ते सामाजिक समतेचे प्रभावी अस्त्र आहे. इतिहासात वंचित, दलित, आदिवासी, महिला यांना मतदानाचा अधिकार मिळवण्यासाठी मोठे संघर्ष करावे लागले. आज त्या हक्काचा वापर न करणे म्हणजे त्या संघर्षांचा अवमान ठरतो. मतदानामुळेच वंचित घटकांचे प्रश्न विधानसभेत, संसदेत पोहोचतात. मतदानाद्वारेच प्रतिनिधित्व बदलते, धोरणे बदलतात. त्यामुळे मतदान हे केवळ स्वतःसाठी नव्हे, तर ज्यांचा आवाज दबला आहे त्यांच्यासाठीही महत्त्वाचे आहे.

लोकशाहीत मतदान म्हणजे केवळ एखाद्या उमेदवाराला निवडणे नव्हे; तर असमाधान नोंदवण्याचाही मार्ग आहे. ‘नोटा’ हा पर्याय लोकशाहीतील असहमतीचा वैधानिक मार्ग आहे. सर्वच उमेदवार अयोग्य वाटत असतील, तरी मतदान केंद्रावर जाऊन आपली भूमिका नोंदवणे हे लोकशाहीला बळ देणारे कृत्य आहे. मतदान न करणे आणि ‘नोटा’ला मतदान करणे यात मूलभूत फरक आहे. मतदान न करणे म्हणजे मौन; ‘नोटा’ म्हणजे सजग निषेध. मतदान हे केवळ निवडणुकीपुरते मर्यादित कृत्य नाही; ते लोकशाहीचा श्वास आहे. श्वास थांबला, तर शरीर जिवंत राहत नाही; तसेच मतदान थांबले, तर लोकशाही नावापुरती उरते. म्हणून मतदानाकडे केवळ माझा हक्क म्हणून पाहणे अपुरे आहे. ते आहे माझी जबाबदारी, माझे कर्तव्य आणि माझी ताकद. लोकशाही जपायची असेल, तर ती वापरावी लागते. मतदानाद्वारे सजगपणे आणि निर्भयपणे, कारण मतपेटीत टाकलेले प्रत्येक मत हे केवळ कागद नसते तर ते असते लोकशाही जिवंत ठेवणारे वचन.



# श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन दिलीप बेंगसरकर यांनी घेतली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : भारतीय क्रिकेट टीमचे माजी कर्णधार दिलीप वेंसरकर सोमवारी विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी आले होते. त्यांनी सह पत्नी श्री विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेतले त्यानंतर मंदिर समितीचे सदस्य ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज जळगावकर यांच्या हस्ते दिलीप वेनसरकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी नाना कवठेकर, श्याम दिवेकर, यांच्यासह मंदिर समिती अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# स्वेरीत राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांना अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट मध्ये राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांची ४२८ वी जयंती व स्वामी विवेकानंद यांची १६३ वी जयंती साजरी करण्यात आली.



सुरवातीला राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांचे पूजन संस्थेचे सचिव डॉ. सुरज रोंगे यांच्या हस्ते करण्यात आले व त्यानंतर डॉ. सूरज रोंगे यांनी ‘युवाशक्तीची देशाला असणारी गरज आणि त्या माध्यमातून राष्ट्र विकासासाठी युवकांचे अतुलनीय योगदान यावर प्रकाश टाकला. त्याचबरोबर राष्ट्रमाता, राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकून माँसाहेबांच्या कार्याची ओळख करून देताना त्यांनी इतिहासातील शौर्याचे अनेक दाखले यावेळी दिले.

यावेळी स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम.पवार, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (डिप्लोमा)चे प्राचार्य डॉ. एन.डी.मिसाळ, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग (ऑटोनॉमस) च्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. एम.एस. मठपती, प्रवेश प्रक्रिया अधिष्ठाता प्रा. यु.एल.अन-ुसे, एम.बी.ए च्या विभागप्रम ुख डॉ. एम.एम.भोरे, डॉ. पी.ए. सातारकर, डॉ.बामणे, प्रा. ए.बी.कोकरे, प्रा. सुनिल भिंगारे, प्रा. रोडगे, प्रा. मोरे, प्रा. कृष्णा तेलंग व इतर प्राध्यापक व प्राध्यापिका उपस्थित होते.

# क्रेडाई पंढरपूर गृह उत्सव २०२६चे १६ जानेवारी रोजी उद्‌घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : क्रेडाई पंढरपूर आयोजित गृह उत्सव २०२६ चे उद्घाटन राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे तसेच प्रफुल्ल तावरे (अध्यक्ष क्रेडाई महाराष्ट्र) व आशिष पोरखाना (सचिव क्रीडाही महाराष्ट्र) यांच्या हस्ते संपन्न होणार आहे ग्रह उत्सव २६ जानेवारी ते १८ जानेवारी या कालावधीत असणार असल्याची माहिती क्रीडाही पंढरपूरचे अध्यक्ष आशिष्या यांनी सांगितले आहे यासाठी रेल्वे मैदान पंढरपूर येथे भव्य शामियाना उभारण्यात आला आहे या ठिकाणी बांधकाम व्यवसायिकांसाठी विविध नाम ांकित कंपनीचे विविध साहित्य वस्तू विक्रीसाठी स्टॉल असणार आहेत त्याचबरोबर सर्व सामान्य माणसाची घराचे स्वप्न साकार करण्यासाठी लागणारी माहिती व तसेच पूर्ण असणारी ग्रह प्रकल्प विविध साईड याबाबत माहिती देणार आहेत. विविध संस्था वित्तीय व खाद्यपदात इत्यादी अनेक महत्त्वपूर्ण स्टॉल उभारणार आहेत. त्या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून आमदार समाधान आवताडे, माजी आमदार प्रशांत परिचारक, आमदार अभिजीत पाटील, पंढरपूरच्या लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉक्टर प्रणिता भालके, युवक नेते प्रणव परिचारक यांची उपस्थिती लाभणार आहे.

# आयुष्याच्या उज्ज्वल पटलासाठी शाळा हे प्रभावी व्यासपीठ : दत्तात्रेय जोंधळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : शालेय जीवनातच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होत असतो ग्रामस्थ,पालक, माजी विद्यार्थी व दानशूर व्यक्तींनी गावोगावी समाजातील महत्वाची भूमिका बजावणाऱ्या व सुजान पिढी निर्माण करणाऱ्या शाळा या म ाध्यमाला स्वतःचे राजकीय जोडे बाजूला काढून निस्वार्थीपणे नेहमी मदत केली पाहिजे असे आव-ाहन करून आयुष्याच्या उज्वल पटलासाठी शाळा हे प्रभावी व्यासपीठ असल्याचे प्रतिपादन पालखेड येथील न्यू इंग्लिश स्कूल येथे वार्षिक गुणगौरव सोहळा व सांस्कृतिक कार्यक्रमाप्रसंगी व्यासपीठावरून महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष/सचिव दत्त-ात्रय जोंधळे यांनी केले.



यापसंगी व्यासपीठावर म हाराष्ट्र शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष निवृत्तीनाना थेटे, सचिव दत्तात्रय जोंधळे, पालखेडच्या सरपंच अश्विनी आहेर, सदस्य राजेंद्र आहेर, योगेश होलगडे, अश-ोक थेटे, संदीप गांगुर्डे, ताराबाई थेटे, सोसायटीचे चेअरमन ज्ञानेश्वर जाधव, पिंपळगाव खरेदी-विक्री संघाचे माजी संचालक रमेश शिंदे, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष धर्माजी गीते, भाऊसाहेब शिंदे, कृष्णा थेटे, माजी सरपंच रवींद्र कोकाटे, स्कूल कमिटीचे उपाध्यक्ष अश-ोक आहेर, मंगेश छाजेड, विलास थेटे, बाळासाहेब थेटे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सतीश थेटे, शिक्षक पालक संघाचे सहसचिव विजय आहेर, माजी अध्यक्ष माधव खैरे, शरद आहेर, माजी मुख्याध्यापक दत्ताराम थेटे, अविनाश कोठावदे, मुख्याध्यापक विना काळे, मुख्याध्यापक अश-ोक शेळके, कैलास गवळी आदी मान्यवर व्यासपीठावर होते.

## पालखेड विद्यालयात वार्षिक गुणगौरव सोहळा व सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात संपन्न

यावेळी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वर्षभरातील क्रीडा, निबंध, वक्तृत्व, विज्ञान आदीसह विविध स्पर्धांमध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह, मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रास्तविकात मुख्याध्यापक अशोक शेळके यांनी शालेय उपक्रम, बोर्ड परीक्षा निकाल ,पोषण आ-हार, विद्यालयाच्या स्थापनेपासून आजपर्यंतचा प्रगतीचा आलेख आदींसह शाळेच्या प्रगतीचा आलेख उपस्थितांसमोर मांडला. त्यानंतर जलसंपदा विभागात गौरव शिरवाडकर तसेच डॉ. रोहित गुऱ्हाळे, चार्टर्ड अकाउंट विजय गुऱ्हाळे, पोलीस ऋतिक काळे, प्रदीप पवार आदी माजी विद्यार्थ्यांची निवड झाल्याबद्दल म ान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात गणेश वंदना, विठू माऊली, शेतकरी, शिवाजी महाराजांवरील गीत, आर्मी गीत, आई-बाबांवरील गीत, नाटिका याबरोबरच वैशिष्ट्यपूर्ण वेशभूषा करून सादर केलेल्या नृत्यांस उपस्थित प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

यापसंगी निलेश गवांदे, दीपक देशमुख, हेमंतकुमार होलगडे, सुनंदा दुर्धवळे, संजय लव्हांगडे, मंगेश कागदे, शैलेश शिखरे, किरण थेटे, राहुल दवते, वैशाली मोते, सागर जाधव, राजेंद्र नाठे, संदीप आहेर, दत्त-ात्रय पगार, सावन जाधव, संजय कोकतरे, कविता ढोमसे, सारिका पवळे, सुरेश गांगुर्डे, रामदास पवार, नदीम तांबोळी आदींसह पालखेड, रानवड, दावचवाडी, लोणवाडी, कुंभारी, वावी ठुशी आदी गावांसह पंचक्रोशीतील पालक, ग्रामस्थ, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बोळकवटे येथील अंगणवाडी मदतनीस निवड प्रक्रियेत घोळ, निवड प्रक्रिया पुन्हा घेण्यात यावी : सरपंच लालासाहेब नदाफ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोळकवटे येथील अंगणवाडी क्रमांक दोन मध्ये मदतनीस ही निवड प्रक्रिया करताना बालविकास प्रकल्प अधिकारी विशाल भोसले यांनी काही राजकीय हस्तक्षेप करून सदर निवड झाल्याचा प्रकार आढळल्याने गावा-तील नागरिकांची तक्रार ग्राम पंचायतकडे आल्याने आपणास या निवड प्रक्रियेमध्ये राजकीय आणि आर्थिक व्यवहार करून सदर निवड झालेली दिसून येत आहे सदर निवड प्रक्रियेत मुस्कान समीर नदाब यांना इयत्ता बारावी मध्ये ८०.४६% गुण तर कौशल शकील नदाफ यांना ६१. १७% गुण तर सुमया जावेद नदाफ ेला ५३.६९% असे एकूण तीन जणांची निवड यामध्ये झाले असून त्यात त्याम ध्ये मुस्कान दादा यांची निवड होणे आवश्यक असताना त्यात काही आर्थिक व राजकीय व्यवहार करून कौसर शकील नदाफ यांची निवड करण्यात आली आहे त्यामुळे अंगणवाडी मदतनीस पदाची प्रक्रिया असे आम्हीच दाखवून होत असले तर अशी निवड होणे ही प्रक्रिया योग्य नसून पुन्हा एकदा निवड प्रक्रिया करावी अशी मागणी बोळकवटीचे सरपंच लालासाहेब बंदगी नदाब यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.



# कळंब येथे नामविस्तार दिन उत्साहात साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : कळंब येथे नाम विस्तार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. नामविस्तार दिन तब्बल १८ वर्षानंतर मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्या म्हणून आंबेडकर प्रेमी जनतेने केलेला संघर्ष, या दरम्यान अनेकांचे बलिदान, घरांची राख रांगोळी झाली होती. प्रचंड अन्याय अत्याचार जातीय दंगली झाल्यानंतर मिळालेले नाव. आदी आठवणींना उजाळा देत आज कळंब शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे पुष्पहार अर्पण करून लढ्यातील शहिदांना विनम्र अभिवादन करून नामविस्तार दिन साजरा केला.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते सतपाल बनसोडे, सुनील गायकवाड, शिवाजी शिरसाट, कुंदन गायकवाड, बंडूभाऊ बनसोडे, अनिल हजारे, राहुल हौसलमल, मोहन गायकवाड,राहुल मुळे, सचिन तीरकर, राजाभाऊ गायकवाड, प्रमोद ताटे, मुकुंद साखरे,संदीप सोनवणे, बाळासाहेब हौसलमल, माणिक गायकवाड यांच्या सह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# मकरसंक्रांत सणानिमित्त विठ्ठल रुक्मिणी मंदिरात रंगीबेरंगी फुलांची आरास

## रुक्मिणीमातेला पारंपारिक अलंकार; भाविकांसाठी आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : प्रतिवर्षीप्रमाणे दि १३ ते १५ जानेवारी या कालावधीत भोगी, मकरसंक्रांत व किंक्रांत संपन्न होत असून, या सणानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी होते. येणाऱ्या भाविकांना सुलभ व जलद दर्शन व्हावे यासाठी मंदिर समितीकडून भाविकांसाठी आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध केल्या आहेत. तसेच सर्व प्रथा व परंपरेचे पालन करून मंदिरात रंगीबेरंगी फुलांची आरास करण्यात आली असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

बुधवार दि. १४ जानेवारीला मकरसंक्रांत निमित्त श्री रूक्मिणी मातेला पारंपारिक अलंकार परिधान करण्यात आले. त्यामध्ये सोने मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, जवेच्या माळा, तांबडी चिंचपेटी, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, जवमणी पदक, हायकोल, सरी, कंबरकट्टा, लक्ष्मीहार इत्यादी अलंकाराचा समावेश आहे.

**वाणवसा करण्यासाठी महिला भाविकांची गर्दी**

तसेच वर्षभरातील विविध सण – उत्सवा दिवशी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात आकर्षक व मनमोहक सजावट केली जाते. त्याप्रमाणे मकरसंक्रांती सणानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात रंगीबेरंगी फुलांची आरास करण्यात आली आहे. त्यामध्ये गाभारा, चारखांबी, नामदेव पायरी येथील भाग सजावटीने आकर्षक व मनमोहक दिसत आहे. सदरची सजावट अमोल शेरे, पुणे यांनी सेवाभावी तत्त्वावर मोफत केली आहे. त्यासाठी २००० शेवंती, १०० गुलाब गड्डी, बेंगलोर शेवंती १०, ऑर्किड १०, ग्रीनरी ३०, कामिनी ३००, भगवा झेंडू १०० किलो, पिवळा झेंडू १०० किलो व पांढरी शेवंती ५० किलो इत्यादीचा वापर केला आहे. या सजावटीसाठी सुमारे ५० कामगारांनी परिश्रम घेतले.

श्री विठ्ठल रुक्मिणीमातेच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच महिला भाविकांनी मंदिरात गर्दी केली आहे. भाविकांची गर्दी विचारात घेऊन, सुलभ व जलद दर्शन होण्याच्या दृष्टीने टोकन दर्शन पास बुकिंग व्यवस्था बंद ठेवण्यात आली आहे. तसेच थेट दर्शनावर निर्बंध, पुजेची संख्या कमी करणे, महिला सुरक्षा रक्षकांची नेमणूक व आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. श्री रुक्मिणी मातेला सुवासिनी महिलांनी नवधान्याचे वाण अर्पण करण्यासाठी गर्दी केली असून, हजारो महिला भाविक पहाटेपासूनच ताटात हळद, कुंकू, तिळगुळ, ऊस, बोर, गाजर, हुरडा यासह अन्य प्रकारचे धान्य अर्पण करण्यासाठी मंदिरात आल्या आहेत. फुलांची सजावट, पुरेसा सोई सुविधा, चांगली स्वच्छता,



चांगल्या दर्शन व्यवस्थेने भाविक समाधान व्यक्त करीत असल्याचे यावेळी प्र. व्यवस्थापक संदेश भोसले यांनी सांगीतले.

# बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यकारी सहाय्यकपदी उमेश पोरे यांची निवड झाल्याबद्दल सत्कार संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यकारी सहाय्यक पदी निवड झाल्याबद्दल श्री उमेश मारुती पोरी यांचा पंढरपूर मार्केट यार्ड येथील संपर्क कार्यालय विशेष सत्कार करण्यात आला यावेळी श्री नागेश फाटे यांच्या हस्ते हा सन्मान सोहळा संपन्न झाला.

एका जबाबदार पदावर निवड झाल्याबद्दल उमेश पुरे यांची सर्व स्तरातून कौतुक होत आहे त्यांचा या यशाचा गौरव करण्यासाठी आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या सत्कार समारंभाला श्री विष्णू पवार, श्री अरुण पाटील, श्री दत्तात्रेय पोरी, श्री नवनाथ बचुटे, यासह मान्यवर व मित्रपरिवार उपस्थित होता उपस्थित सर्वांनी उमेश भुरे यांच्या कष्टाचे आणि जिद्दीचे कौतुक करत त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी सत्काराला उत्तर देताना उमेश पोरी यांनी सर्वांचे आभार मानले आणि आपल्या पदाच्या माध्यमातून जनसेवेचा वसा पुढे नेणार असल्याची सांगितले.

# सिकलसेल मुक्तीसाठी उपजिल्हा रुग्णालयाचे निफाड येथे विशेष अभियान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : राष्ट्रीय सिकलसेल ॲनिमिया निर्मूलन मिशन अंतर्गत सिकलसेल आजाराच्या निर्मूलनासाठी जिल्हा रुग्णालय नाशिक येथील डॉ चारुदत्त शिंदे व निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ संदीप सूर्यवंशी यांच्या आदेशानुसार उपजिल्हा रुग्णालय निफाड व तालुका आरोग्य विभागाच्या वतीने विशेष तपासणी व जनजागृती अभियान उपजिल्हा रुग्णालय निफाड येथे कार्यरत वैद्यकीय अधिक्षक डॉ राजीव तांभाळे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणार आहे.

सिकलसेल आजाराचा प्रादुर्भाव असलेल्या भागांमध्ये १५ जानेवारी ते ९ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत हे अभियान राबविले जाणार आहे.

**आरोग्य कर्मचारी करणार घरोघरी तपासणी**

या मोहिमेअंतर्गत निफाड तालुक्यातील प्रत्येक गावात आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका, आरोग्य सेवक व सेविका घरोघरी भेट देऊन नागरिकांची प्राथमिक तपासणी व जनजागृती करणार आहेत. विशेषतः ० ते ४० वयोगटातील नागरिकांवर लक्ष केंद्रित करण्यात येणार असून संशयित रुग्णांची सविस्तर तपासणी केली जाणार आहे.

या अभियानाचे टप्पे बाबत माहिती सांगताना डॉ राजीव तांभाळे वैद्यकीय अधिक्षक यांनी पुढील बाबत माहिती दिली.

पहिल्या टप्प्यात (१५ ते २० जानेवारी) सिकलसेल रुग्ण तसेच अद्याप तपासणी न झालेल्या व्यक्तींची यादी तयार करण्यात येणार आहे.

दुसऱ्या टप्प्यात (२१ ते २५ जानेवारी) सिकलसेल टेस्ट पॉझिटिव्ह, तसेच AS आणि SS प्रकारातील व्यक्तींची पुढील तपासणी केली जाणार आहे.

तिसऱ्या टप्प्यात (२७ जानेवारी ते ९ फेब्रुवारी) प्राथमिक तपासणी झालेल्या रुग्णांची इलेक्ट्रोफोरेसीस तपासणी करून अंतिम निदान निश्चित करण्यात येणार आहे.

‘सिकलसेल कुंडली’ तयार होणार

अभियानाच्या अंतिम टप्प्यात प्रत्येक गावात विवाहित व गर्भधारणेपूर्व जोडप्यांचे समुपदेशन केले जाणार असून ‘सिकलसेल कुंडली’ तयार करण्यात येणार आहे. सिकलसेल हा आनुवंशिक आजार असल्याने पुढील पिढी सुरक्षित राहावी, यासाठी योग्य मार्गदर्शन देण्यात येणार असल्याचे आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे.

या अभियानाबाबत तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ सुजित कोशीरे यांनी अधिकची माहिती देताना नागरिकांना सहकार्याचे आवाहन सिकलसेल निर्मूलनासाठी लोकसहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. नागरिकांनी आरोग्य कर्मचाऱ्यांना योग्य माहिती द्यावी व तपासणी करून घ्यावी, असे आवाहन उपजिल्हा रुग्णालय निफाड व तालुका आरोग्य प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# आमदार सत्यजित तांबे यांची निफाड माध्यमिक शिक्षक पतसंस्थेस सदिच्छा भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुका माध्यमिक शिक्षक शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेच्या प्रगतीचा आलेख सदैव उंचावणारा असून संस्थेची इमारत,भव्य दिव्य जागा तसेच तालुकास्तरीय कर्मचारी पतसंस्थेचा मी बघितलेला एकमेव बहुउद्देशीय सभागृह एवढा अद्ययावत असल्याचे सांगितले. तसेच शिक्षक पतसंस्थेच्या उपक्रमांचा आढावा घेत शिक्षकांचे प्रश्न, शैक्षणिक गुणवत्ता व संघटनात्मक मजबुती याबाबत मोलाचे मार्गदर्शन करून शिक्षकांच्या प्रश्नांसाठी सदैव कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन निफाड तालुका दौऱ्याप्रसंगी निफाड माध्यमिक शिक्षक पतसंस्थेस भेटप्रसंगी नाशिक विभाग पदवीधर मतदार संघाचे आमदार सत्यजित तांबे यांनी केले.

याप्रसंगी पुढे बोलताना आमदार सत्यजित तांबे यांनी शिक्षक नेते तथा संस्थेचे संस्थापक शिवाजीराव निरगुडे, संस्थापक अध्यक्ष कैलास भारती यांच्या मार्गदर्शनाखाली पतसंस्था यश शिखरावर पोहचली असून रौप्य महोत्सवी वर्ष देखील नुकतेच साजरे करण्यात आले असल्याचे सांगितले.

यावेळी आमदार सत्यजित तांबे,कृषीतज्ञ सचिन होळकर यांचा संस्थेच्या वतीने संस्थापक शिवाजीराव निरगुडे यांच्या हस्ते यथोचित सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी खासदार तथा संस्थेचे अध्यक्ष भास्करराव भगरे नियोजित दौऱ्यावर असल्याकारणाने संस्थापक, शिक्षक नेते शिवाजीराव निरगुडे, कैलास भारती, उपाध्यक्ष बाळकृष्ण वाजे, कार्यवाह राहुल दवते, संचालक रामराव बनकर, बाळासाहेब गुंजाळ, नगरसेवक साहेबराव बर्डे, किरण जाधव, गणेश महाले, भगीरथ सोनवणे यांसह एन डी एस टी संस्थेचे संचालक समीर जाधव, माजी नगरसेवक देवदत्त कापसे, युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सचिन खडताळे, कृषीतज्ञ सचिन होळकर, बाळासाहेब सोनवणे, सुनील होळकर, राजाभाऊ होळकर, अली शेख, संदीप गिरी, हेमंत खैरनार, व्यवस्थापक रतन दिवटे, ज्ञानेश्वर धाटबळे आदी उपस्थित होते.

# तुळजापूर येथे रिपाइं (आठवले) च्या वतीने नामविस्तार दिन उत्साहात साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस. के. गायकवाड : डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद )चा ३४ वा नामविस्तार वर्धापन दिन मोठ्या उत्साहात आनंदीव वातावरणामध्ये तुळजापूर येथील आंबेडकर चौक येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आठवले )च्या वतीने साजरा करण्यात आला.

प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते येथील महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णकृती पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले त्यानंतर फटाक्याची आतिषबाजी करून पेढे वाटून डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद)चा नामविस्तार वर्धापन दिन साजरा करण्यात आला.

या प्रसंगी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) चे धाराशिव जिल्हा कार्याध्यक्ष बाबासाहेक मस्ते, तुळजापूर शहर शहराध्यक्ष वैजनाथ पांडागळे, यूवा आघाडीचे धम्मशील कदम,तानाजी उमाजी कदम,मनोज धांडे, रिपाइं ओबीसी आघाडी शहराध्यक्ष लहू घोडके बाळू कदम,बालाजी जाधव महादू, सोनवणे महेश इंदापुरे,संदीप कदम,मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते

# मकर संक्रांत सणादिवशी विरोधी गटाकडून निष्ठावंत कार्यकर्त्यावर हल्ला: शहर पोलीस ठाण्यात तक्रार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर नगरपरिषद निवडणुकीमध्ये पंढरपूर शहर दहशत मुक्त करणार अशी घोषणा भारतीय गटाकडून करण्यात आली होती. मात्र मकर संक्रांत सना दिवशी माजी नगरसेवकाच्या पतिवर व पांडुरंग परिवारातील निष्ठावंत कार्यकर्ते नवनाथ रानडे यांना शिवीगाळ करून मारहाण करण्यात आलेली घटना घडली आहे.

पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात एकमेकाविरुद्ध तक्रार करण्यात आलेले एनसी दाखल करण्यात आले आहे. पंढरपूर शहरात खळबळ उडाली आहे. पंढरपूर शहर वरिष्ठ पोलीस निरीक्षक म्हणून श्री दशरथ वाघमोडे यांच्यासमोर भुरट्या दादागिरीला रोखण्याची आव्हान असल्याची दिसून येत आहे. मकर संक्रांत व एकादशी एकत्र आल्यामुळे पंढरपूर शहरामध्ये एक ते दीड लाख भावी दाखल झाले आहेत. त्यामुळे पंढरपूर शहरात सर्वत्र गर्दी दिसून येत आहे. शहरत मुक्त शहर हो विविध विकास कामाचा अजिंठा जाहीर करण्यात आला होता. मतदारांनी तीर्थक्षेत्र विकास आघाडीच्या उमेदवार डॉक्टर प्रणिता भालके त्यांना भरघोस मतदान करून विजयी केले आहे.

कालच मंगळवार रोजी श्री दशरथ वाघमोडे यांनी वरिष्ठ शहर पोलीस स्टेशनचा पदभार स्वीकारला आहे. लगेच दुसऱ्याच दिवशी माजी नगरसेवकाचे पती रानगट यांच्यावर हल्ला झाल्याची घटना घडली आहे त्यामुळे पंढरपूर शहरातील भुरट्या दादागिरीला रोखण्याची आव्हान पंढरपूर शहर पोलिसावर आले आहे. यामध्ये दोन्ही बाजूंनी एकामेकावर तक्रारी करण्यात आले आहेत. त्यामुळे पंढरपूर शहरामध्ये खळबळ उडालेली दिसून येत आहे.

## काकासाहेबनगर महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात

# ग्रामीण भागातील तरुणांनी आपल्यातील सामर्थ्य ओळखावे- दीपक घंगाळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : नव्या तंत्रज्ञानाला न बिचकता सामोरे गेल्याशिवाय आपली प्रगती शक्य नाही. आपल्याला आपले निश्चित केलेले ध्येय गाठायचे असेल तर आपण नवनवीन तंत्रज्ञान शिकून घेतलेच पाहिजे. त्यासाठी चिकाटी आणि परिश्रम करण्याची आपली तयारी असली तर आपल्या ध्येयपूर्तीपासून आपल्याला कुणीच हटवू शकत नाही. ग्रामीण भागातील तरूण आपल्या मनात नाहक न्यूनगंड बाळगत असतो. उलट त्याच्यात प्रतिकूल परिस्थितीशी झटण्याचे सामर्थ्य असते फक्त गरज आहे ते सामर्थ्य ओळखण्याचे. असे प्रतिपादन उद्योजक





आणि महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी दीपक घंगाळे यांनी केले.

के के वाघ महाविद्यालय काकासाहेबनगर येथे ‘स्नेहगंध’ या माजी विद्यार्थी मेळाव्याच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून घंगाळे बोलत होते. त्यांनी माजी विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या आठवणीना उजाळा देत, आपल्यातल्या उद्योजकाच्या यशाची कहाणी कथन केली.

महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी, आशिष लहारे, प्रियांका जाधव, गायत्री माळी, निकिता जाधव, शुभम शिंदे, तेजस घोलप, कावेरी जाधव, नवनाथ पगार, ऋतुजा आहेर, तेजस गोसावी यांनी आपले मनोगत व्यक्त करून महाविद्यालयाचे ऋण व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी के. के. वाघ शिक्षण संस्थेचे जनसंपर्क संचालक अजिंक्य बाळासाहेब वाघ होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून माजी विद्यार्थांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एल. जाधव यांनी केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख प्रा. वैशाली शिंदे यांनी करून दिली. सूत्रसंचलन प्रा. नीलेश आहेर तर आभार डॉ. अरुण ठोके यांनी मानले.

कार्यक्रमास महाविद्यालयाचे विकास समिती सदस्य रामनाथ पानगव्हाणे, माजी विद्यार्थी मेळावा अध्यक्ष वैभव नंदकुमार कुशारे माजी विद्यार्थी मेळावा समन्वयक प्रा. अर्चना ताकाटे, प्रा. किरण वाघ, माजी विद्यार्थी व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्येनं उपस्थित होते.

# महाराष्ट्र शासनाचे अधिकृत सेवा केंद्र श्रीकृष्ण कॉम्प्युटर्स यांच्या उद्घाटन समारंभ आज देगाव येथे उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : हा उद्धाटन सोहळा मा श्री दादासाहेब गांवधरे(सहाय्यक महसूल अधिकारी) मा श्री दिनेश भडंगे (मंडलाधिकारी बंडी शेगाव) मा सावित्री मेढेदार मॅडम (ग्राम महसूल अधिकारी गादेगाव) यांच्य शुभ हस्ते पार पडला.

यावेळी उपस्थित राहून श्री महेश भास्कर मस्के यांच्या श्रीकृष्ण कॉम्प्युटर्स या नव्या उपक्रमाचे मनःपूर्वक अभिनंदन करत पुढील वाटचालीस यशस्वी शुभेच्छा दिल्या याप्रसंगी सरपंच, उपसरपंच, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे व्यापार उद्योग प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे, यांनी त्यांना पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या गावातील सर्व प्रतिष्ठित नागरिक व समस्त ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



गादेगावकरांसाठी शासकीय सेवा अधिक सुलभ व पारदर्शक करण्याच्या दिशेने हे केंद्र निश्चितच उपयुक्त ठरेल असा विश्वास उपस्थित अशी संवाद साधताना व्यक्त केला.

दैनिक
यश सिद्धि न्यूज



# विद्यार्थ्यांनी आपली दिशा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारखी ठरवावी

## पंकज तागडे यांचे प्रतिपादन; करिअर मार्गदर्शन व समुपदेशन कार्यक्रम संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोंदिया/प्रतिनिधी : या जगातील अतिशय महत्त्वाचे विद्यार्थी फक्त डॉ बाबासाहेब आंबेडकर हे होते. त्यांची जगात किमया तशी उमटली आहे. बाबासाहेब आंबेडकर यांनी विश्वातील घटकांचा विचार करून सर्व समाजाचे उद्धार होईल यासाठी उत्तम प्रयत्न केला. परिस्थिती सुधारली समाजाला मोठे केले. असा जगाचा उद्धारक कोणीच नाही. म्हणून विद्यार्थ्यांनी आपली दिशा डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारखी ठरवावी. असे प्रतिपादन के. की. एस. जिल्हा सामान्य रुग्णालय गोंदिया येथील समाजसेवा अधिक्षक पंकज तागडे यांनी केले. ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

यावेळी मंचावर शाळेतील शिक्षक मुन्नाभाई नंदागवळी यांच्या अध्यक्षतेखाली प्रदीप ढवळे, पी ए लांजेवार, आशिष शहारे, कार्तिक शहारे, दीक्षा तुरकर व तुषार महाजन आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

सदर कार्यक्रम अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा, नंगपुरामुर्री येथे पार पडला. याप्रसंगी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांना माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना नंदागवळी म्हणाले- वर्ग दहावीतील विद्यार्थ्यांनी अभ्यास करणे आवश्यक आहे. कोणताही काम करायला अभ्यास करावेच लागते. भविष्याचा वेध घ्यायचा असेल तर अभ्यासाशिवाय दुसरा मार्ग नाही. दिवसेंदिवस बोर्डाच्या परिक्षा ह्यांची नियमावली वाढत जाते. तसेच आरोग्य, शिक्षण, कला, साहित्य, वैयक्तिक सुरक्षा, स्वच्छता तसेच व्यायाम, मानसिक संतुलन राखण्यासाठी आणापान या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रम संचालन व आभार शाळेतील विद्यार्थी यांनी करून सहकार्य करयात आले व वंदे मातरम् या गितानी कार्यक्रम संपन्न झाला.

# अंत्री खेडेकर येथे गयबन शाह बाबा यांचा उरूस मोठ्या उत्साहात साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी :

चिखली : तालुक्यातील अंत्री खेडेकर येथे सर्वधर्म समभाव असलेली दर्गा हाजी हजरत गयबन शाह वली यांचा उरूस १४ जानेवारी रोजी मोठ्या उत्साहात पार पडला. याच दिवशी मकर संक्रांती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिवस आणि पीर बाबांची पुण्यतिथी सोहळा असतो या तिन्ही शुभ दिवसांचे औचित्य साधून सर्वधर्मीयांनी मिळून समता, बंधुता आणि एकता आत्मसात करून या सोहळ्याची शोभा वाढवली.

किती आनंदी, किती चैतन्यदायी श्रद्धेचा हा दिवस, उजेडात न्हाऊन निघाला पीर गयबन शाहचा उरस...

बाबांची पालखी दर्गाचे खादिम अय्युब शेख रतन यांच्या घरातून निघून थेट दर्गा शरीफवर फुल चादर, मजार ए गिलाफ आणि चंदनाचा लेप म्हणजेच संदल सायंकाळी ७ वाजता बाबांना अर्पण करण्यात आला. यावेळी दर्गाचे खादीम अय्युब शेख, हमीद शेख, शकुर खान, राम सदाशिव माळेकर, रामेश्वर बद्रीनाथ खेडेकर, गोपाल पवार, आकाश सुदाम देवा खेडेकर, आदित्य माळेकर, करण पेंढारकर राजू भाई शेख, दिपेश मोरे, संविधान वाठोरे, सुमित खेडेकर, अकिल शेख, नाणेतज्ञ शेख दिलावर आदीं भाविक भक्त उपस्थित होते.

# सैनिक टाकळीच्या शिरोपेचात भर; सैनिक टाकळीचे चार जवान इंडीयन आर्मीमध्ये सिलेक्शन









**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सैनिक टाकळी/संजय चव्हाण

सैनिक टाकळी ता.शिरोळ जि.कोल्हापुर येथुन १३ जानेवारी हा दिवस सैनिक टाकळी करांच्या सैनिकी परंपरेला झळाळी देणारा एक सुवर्ण दिवस ठरला.

कारण आज सैनिक टाकळीतील चार तरुणांची इंडियन आर्मी मध्ये अग्निवीर म्हणून निवड झाली. सैन्यातील कुठलीही भरती असो सैनिक टाकळीतील एखादा मुलगा हा त्यामध्ये भरती व्हायचाच पण कोरोना मध्ये कित्येक मुलांची भरतीची वर्षे वाया गेल्यामुळे सैन्यामध्ये भरती होणाऱ्या असंख्य मुलांच्या संख्येमध्ये थोडा खंड पडला होता.

पण यावर्षीच्या अग्निवरच्या भरतीमध्ये सैनिक टाकळीतील तब्बल चार तरुणांची अग्नीविर म्हणून निवड झाली यामुळे संपूर्ण गावांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

कुमार अवधूत विजय पाटील, अनिकेत आप्पासो पाटील, अनुराग रविकांत पाटील, संदेश दीपक वासमकर या तरुणांच्या यशामुळे सैनिक टाकळी मध्ये देशासाठी लढण्याची, जगण्याची भावना आपल्याला दिसून येते.

प्रचंड चिकाटी, जिद्द ,मेहनत , व्यायाम, अभ्यास या सर्व प्रयत्न मुळे त्यांना हे यश लाभले. त्यांच्या या यशामुळे कित्येक तरुण मुलांच्या मध्ये सैन्यामध्ये भरती होण्यासाठी व देशासाठी सीमेवरती लढण्याची भावना जागृत झालेली आहे.

या मुलांच्या यशामध्ये त्यांचे आई-वडील त्यांचे गुरुवर्य तसेच संपूर्ण टाकळीकरांचा हातभार आहे.

आशा करूया भविष्यकाळात देखील सैनिक टाकळीतील असंख्य युवक सैन्यामध्ये भरती होऊन देशभक्तीची ही पेटलेली मशाल अशीच जिवंत ठेवतील.

# श्री बालाजी मंदिरात भव्य कल्याण उत्सवने धनुर्मासची सांगता



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : कळंब येथील श्री बालाजी मंदिरात भव्य दिव्य कल्याण उत्सव शुभविवाह चे आयोजन करण्यात आले होते. दि१३ जानेवारी मंगळवार रोजी श्री गोदा (लक्ष्मी) आणि श्री रंगनाथ (बालाजी) यांचा शुभविवाह हजारो भक्तांच्या साक्षीने भक्ती भावात संपन्न झाला. दि १६ डिसेंबर पासून सुरू असलेल्या धनुर्मास उत्सवाची सांगता या कल्याण उत्सवाने झाली. आकर्षक रोषणाई , फुलांचे तोरण, केळीची पाने , रंगीबेरंगी कापड याने मंदिराच्या सभागृहाला भव्य लग्न मंडपाची सजावट करण्यात आली होती. सायंकाळी चार वाजता आकर्षक रथा मधून श्री रंगनाथ यांची वरात मिरवणूक वाजत गाजत निघाली. स्त्रियांच्या लाल साड्या तर पुरुषांचे पांढरे कपडे व गुलाबी फेटा याने वराती मधील शिस्तबद्धता व उल्हास हे विशेष आकर्षण ठरले. फटाक्यांची आतिषबाजी, फुगडी आणि गरबा नृत्याने वरात सजली होती. वर श्री रंगनाथ आणि वधू श्रीगोदा यांना लग्न मंडपात मोठ्या उत्साहाने पुष्पवृष्टी करत आणले गेले.यजमान आणि उपस्थित भक्तांना द्वारे श्रीगोदा (लक्ष्मी ) कन्यादान विधी पूर्ण करण्यात आला. विश्वकसेन पूजा, मंगलाष्टक आणि अक्षता मुख्य पुजारी श्री रामाप्रपन्नाचार्य (मोनूजी महाराज ) यांच्या हस्ते हा गोदा कल्याण उत्सव संपन्न झाला .

गोदा कल्याणम हा प्रामुख्याने दक्षिण भारतात साजरा केला जाणारा एक अत्यंत पवित्र आणि शुभ उत्सव आहे.गोदा देवी (लक्ष्मी) आणि भगवान रंगनाथ (बालाजी) यांच्या दिव्य विवाहाचे प्रतीक आहे. अलवर संतांमध्ये गोदा देवी ही एकमेव महिला संत होती. गोदा देवी ना लक्ष्मीचा अवतार आणि भक्तीचे सर्वोच्च अवतार मानले जाते.भगवान विष्णूला पती म्हणून प्राप्त करण्यासाठी गोदा देवी ने धनुर्मासात 'थिरुपवै' नावाचा उपवास केला.हा उत्सव भक्त आणि देवतेच्या मिलनाचे प्रतीक आहे. असे मानले जाते की या कल्याणममध्ये सहभागी होणाऱ्या भक्तांना त्यांच्या कौटुंबिक जीवनात आनंद, शांती मिळते आणि अविवाहित लोकांना योग्य जीवनसाथी मिळतो.

असा अध्यात्मिक मान्यता असलेला तिरुपती येथील उत्सव कळंब बालाजी मंदिरात भव्य प्रमाणात साजरा केला गेल्या असल्याने अनेक बालाजी भक्तांना हो पवित्र पर्वणी च होती. शुभ विवाहनंतर हजारो भाविकानी प्रसादाच लाभ घेतला.श्री बालाजी मंदिरात असे भव्य आणि पवित्र उत्सव साजरे होतं असल्याने भक्तांमध्ये आनंद व्यक्त केला जात आहे.

# साने गुरुजी राष्ट्रीय शिक्षक रत्न पुरस्काराने सुरेश टेकाळे व डॉ. गिरीश कुलकर्णी सन्मानित



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला, मुंबई च्या वतीने दोन दिवसीय ५८ वे राष्ट्रीय अधिवेशन बेळगाव (कर्नाटक) येथे आयोजित करण्यात आले होते .या कार्यक्रमाचे अध्यक्ष हसन देसाई राष्ट्रीय अध्यक्ष, अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला,मुंबई स्वागताध्यक्ष राजाभाऊ पाटील, उपाध्यक्ष, दक्षिण महाराष्ट्र शिक्षण मंडळ, बेळगाव प्रमुख कार्यवाहक सुनिल पुजारी, प्रमुख पाहुणे मा .आकाश चौगुले अप्पर आयुक्त जी एस टी बेळगाव, मा आनंद मेनसे थोर विचारवंत,साहित्यिक बेळगाव यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. या अधिवेशनामध्ये अखिल भारतीय साने गुरुजी कथामालेच्या माध्यमातून शैक्षणिक , सामाजिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मुख्याध्यापक, शिक्षक व इतर यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. या राष्ट्रीय अधिवेशनात कळंब तालुक्यातील कै. भाई नारायणराव लोमटे विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा धाराशिव जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सुरेश काका टेकाळे यांचा स्वातंत्र्य सेनानी प्रकाश भाई मोहाडीकर स्मृती साने गुरुजी राष्ट्रीय शिक्षक रत्न पुरस्कार उपस्थित मान्यवरांचे हस्ते शाल , सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच अखिल भारतीय साने गुरुजी कथा मला धाराशिव जिल्हाध्यक्ष डॉ.गिरीश कुलकर्णी यांचाही राष्ट्रीय संस्कार दूत पुरस्कार ,शाल , सन्मान चिन्ह, पुष्पगुच्छ देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रम प्रसंगी अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला शाखा कळंब तालुकाध्यक्ष सोपान पवार, प्राचार्य महादेव गपाट व साने गुरुजी कथामाला धाराशिव चे उपाध्यक्ष एस वाय जाधव सर,पवार सर उमरगा, सौ मनीषा आखाडे वाशी यांच्यासह महाराष्ट्रातील व गोवा राज्यातील विविध भागातून सानेगुरुजी च्या विचाराचे अनुयायी उपस्थित होते. मुख्याध्यापक सुरेश काका टेकाळे तसेच डॉ गिरीश कुलकर्णी यांना मिळालेल्या पुरस्कारा बद्दल यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# रेणुका कॉलेज ऑफ एज्युकेशन रेणापूर येथे पदवी वितरण समारंभ



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

रेणापूर प्रतिनीधी/सुधाकर रणदिवे : रेणुका कॉलेज ऑफ एज्युकेशन रेणापूर येथे बी एड सेकंड सेमीस्टरच्या छात्र अध्यापकांचा इंडकशन प्रोग्राम व पदवी वितरण समारंभ कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ मीनल ताई शिवराज मोटेगावकर यांची उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ भागवत गुरमे , डॉ पांडुरंग मामडगे,पोलीस निरीक्षक सुधाकर देडे, नगरसेवक कृष्णा भाऊ मोटेगावकर, नवनिर्वाचित नगरसेवक सौ सुमन ताई मोटेगावकर मॅडम यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्राचार्य डॉ कैलास मोटे यांनी केले .या वेळी पोलिस निरीक्षक सुधाकर देडे, डॉ पांडुरंग मामडगे यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप सौ मीनल ताई शिवराज मोटेगावकर मॅडम यांनी केले .या वेळी बी एड सेकंड सेमीस्टच्या छात्र अध्यापकांना इंडकशन प्रोग्राम बाबत मार्गदर्शन करण्यात आले व माजी विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्याच्या हस्ते पदवी वितरीत करण्यात आल्या.या वेळी बी एड प्रथम वर्षातील व माजी विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राचार्य रतन लहाने, प्रा उमेश रणदिवे ,प्रा रमाकांत गायकवाड,प्रा योगेश माने,राधिका माने , ग्रंथपाल मनिषा लातूरकर, अजय बद्दर, अभिषेक जाधव, व दत्ता चादरे शोभा राठोड, दिलीप राठोड ,यांनी सहकार्य केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदीप अडसुळे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा रमाकांत गायकवाड यांनी केले.

# कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या चार महिला खेळाडूंची आंतर विद्यापीठ क्रिकेट संघात निवड



तन्वी माने



पूजा माने



आकांक्षा रोंगे



अमृता आगवणे

पंढरपूर/प्रतिनिधी : रयत शिक्षण संस्थेच्या येथील कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रासाठी अभिमानास्पद अशी कामगिरी झाली असून महाविद्यालयातील पूजा माने, आकांक्षा रोंगे, तनवी माने व अमृता आगवणे या चार महिला खेळाडूंची पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर अंतर्गत आंतर विद्यापीठ महिला क्रिकेट संघात निवड झाली आहे. ही आंतर विद्यापीठ महिला क्रिकेट स्पर्धा राजस्थान येथील बनस्तली विद्यापीठात होणार आहे.

या खेळाडूंनी विद्यापीठस्तरीय निवड चाचण्यांमध्ये उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत आपल्या गुणवत्तेची चुणूक दाखवली. सातत्यपूर्ण सराव, शिस्तबद्ध प्रशिक्षण व संघभावना यामुळेच ही निवड शक्य झाली असल्याचे क्रीडा विभागाकडून सांगण्यात आले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव सर व सर्व उपप्राचार्य विभाग प्रमुख आणि सर्व प्राध्यापक वर्ग यांनी निवड झालेल्या सर्व खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन केले. तसेच महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. अनिल परमार, प्रा. विठ्ठल फुले तसेच प्रा. मनोज खपाले सर यांनी खेळाडूंना पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. राजस्थान येथे होणाऱ्या या स्पर्धेत खेळाडू आपल्या विद्यापीठासह महाविद्यालयाचे नाव राष्ट्रीय पातळीवर उज्वल करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

**सासवड पोलिस ठाण्याची पाहणी**

**अतिरिक्त पोलीस अधीक्षक गणेश बिरादार यांचे आवाहन**

# बाहेरच्या गुन्हेगारांवर पोलीस पाटलांनी लक्ष ठेवावे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड : पुरंदर तालुका पुणे शहराजवळ असल्याने येथे बाहेरून येणाऱ्या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांकडे पोलिस पाटलांनी बारकाईने लक्ष ठेवावे, असे आवाहन अतिरिक्त जिल्हा पोलिस अधीक्षक गणेश बिरादार यांनी येथे केले.

पुणे जिल्हा ग्रामीण पोलिस यंत्रणेकडून सासवड पोलिस ठाण्याची वार्षिक तपासणी झाली. त्या वेळी बिरादार साहेब यांनी तालुक्यातील पोलिस पाटलांची बैठक घेतली, त्यात ते बोलत होते. या वेळी सासवड पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या सर्व गावचे पोलीस पाटील बंधू भगिनी मोठया संख्येने उपस्थित होते, उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्र गौर, पोलिस निरीक्षक कुमार कदम, सहाय्यक पोलीस निरीक्षक वैभव सोनवणे, गोपनीय रुपेश भगत आणि पोलिस अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. सासवड पोलीस स्टेशन मध्ये मनुष्यबळ कमी आहे ६०.पोलीस कर्मचारी व अधिकारी तसेच ४० पोलीस पाटील सर्वांनी चांगले काम करायचं आहे. सासवड पोलीस स्टेशन अंतर्गत वार्षिक तपासणी दरम्यान आदरणीय अतिरिक्त पोलीस अधीक्षक गणेश बिरादार यांच्या हस्ते उल्लेखनीय कामगिरी केल्या बद्दल कोडीत बु!!चे पोलीस पाटील गणेश बडदे व पांगारे गावचे पोलीस पाटील श्री तानाजी काकडे यांचा सन्मान करण्यात आला.